**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यात रिक्षा परवान्यांचं वाटप आजपासून स्थगित

- राष्ट्रीय शेअर बाजारात नाशिक महानगरपालिकेच्या 'ग्रीन बॉण्ड'चं लिस्टिंग

- पश्चिम आशियातल्या परिस्थितीवर सरकार लक्ष ठेवत असून नागरिकांच्या सुरक्षेसाठी दक्ष असल्याचं परराष्ट्र मंत्र्यांचं संसदेत निवेदन

- पश्चिम आशियातल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर कच्च्या तेलाच्या दरांमधे वाढ

**आणि**

- टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय संघावर अभिनंदनाचा वर्षाव

**<><><><><>**

राज्यातल्या शहरांमध्ये होणारी वाहतूक कोंडी आणि पर्यावरणाचा ऱ्हास यांमुळे रिक्षाच्या परवान्यांचं वाटप आजपासून स्थगित करत असल्याचं राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी जाहीर केलं. विधानभवन परिसरात वार्ताहरांशी बोलताना त्यांनी ही माहिती दिली. राज्य सरकारने पाच लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये स्थानिक पातळीवरच्या परिस्थितीनुसार रिक्षांच्या परवान्यासंबंधीचा निर्णय घ्यावा, अशा सूचना केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने दिल्या होत्या. १९९७मध्ये घातलेली रिक्षा परवाने वाटपावरची स्थगिती जून २०१७मध्ये राज्य सरकारने उठवली होती. यंदाच्या आर्थिक सर्वेक्षणानुसार १ जानेवारी २०२६पर्यंत राज्यात १२ लाख ९६ हजार रिक्षा धावत आहेत. राज्यातल्या अनेक शहरांमध्ये वाहतूक कोंडी आणि वायूप्रदूषण होत असल्याच्या तक्रारी येत होत्या. त्यामुळे रिक्षांच्या परवाने वाटपाला स्थगिती देण्याचा निर्णय आज मंत्रालयात झालेल्या बैठकीत घेण्यात आल्याची माहिती सरनाईक यांनी दिली. काही अटीशर्तींची पूर्तता करूनच परवाने देता येतील का, याविषयी केंद्राशी चर्चा सुरू असून त्यानंतरच अंतिम निर्णय जाहीर होईल, असंही ते म्हणाले.

**होल्ड... बाईट - प्रताप सरनाईक**

**<><><><><>**

राज्य महिला आयोगाला पुरेसा निधी मिळत नसून कर्मचाऱ्यांची कमतरता आहे असा मुद्दा विधानसभेत सुधीर मुनगंटीवार, जयंत पाटील, विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत मांडला. जनजागृती, संशोधन ही आयोगाची कामं आहेत, मात्र निधी मिळत नसल्याने ही कामं करता येत नाहीत असा आरोप पाटील यांनी केला.

आयोगाला खर्च करण्याचे अधिकार द्यावेत अशी मागणी त्यांनी केली. तसंच चालू आर्थिक वर्षात किती निधी मंजूर झाला याची माहिती देण्याची मागणी केली.

यावर आयोगाकडून जेवढ्या निधीची मागणी होते तेवढा निधी दिला जातो असं राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी सांगितलं.

ठाणे जिल्ह्यात वांगणी इथल्या ग्रामीण रुग्णालयामध्ये बुरशी लागलेली औषधे आढळल्याप्रकरणी खरेदीशी संबंधित अधिकारी विभागीय चौकशीत दोषी आढळले तर त्यांना निलंबित केलं जाईल, असं सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितलं. मोहन मते यांनी यासंदर्भात प्रश्न विचारला होता. किसन कथोरे यांनी चर्चेत भाग घेतला. वांगणी रुग्णालयाची दर्जोन्नती करण्यासंदर्भात सर्वंकष आढावा घेऊन प्राधान्यानं विचार केला जाईल, असं आबिटकर यांनी उपप्रश्नच्या उत्तरात सांगितलं.

**<><><><><>**

'बेस्ट'च्या मालकीच्या बसची संख्या वाढवण्याच्या दृष्टीने सरकार उपाययोजना करत आहे, अशी ग्वाही राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी आज विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. बेस्ट बसचे वाढते अपघात, चालकांचं प्रशिक्षण, समुपदेशन, वेतन इत्यादी विषयांवर सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना त्या बोलत होत्या. सध्या बेस्टच्या स्वतःच्या मालकीच्या २४९, तर भाडेतत्त्वावर २ हजार ५२८ बस गाड्या आहेत, लोकसंख्येचा विचार करता शहराला १० हजार गाड्यांची गरज आहे. त्या अनुषंगानं ६ हजार ५५५ विद्युत गाड्यांचा मागणी आदेश ८ कंत्राटदारांना दिला होता, पण काही कारणांनी त्या उपलब्ध होऊ शकल्या नाहीत. २०२६मध्ये फक्त ६८५ गाड्या उपलब्ध झाल्याची माहिती मंत्र्यांनी दिली. बेस्ट बसेसमुळे होणाऱ्या अपघातांचा प्रश्न गंभीर असून सभापतींनी आपल्या दालनात याबाबत बैठक घ्यावी, आणि परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांनाही या बैठकीला बोलवावं, अशी विनंती त्यांनी केली. सभापतींनी ती मान्य केली.

२०२२ ते २०२४ या तीन वर्षांत अपघाताच्या कारणामुळे बेस्ट उपक्रम आणि भाडेतत्त्वावरच्या बसपुरवठा व्यवसाय संस्था यांच्या ५८ बसचालकांवर बडतर्फीची, तर ६०३ बसचालकांवर निलंबनाची कारवाई झाल्याचं सरकारनं लेखी उत्तरात सांगितलं. तसंच इतर कारणांमुळे २०२२ ते २०२५ दरम्यान बेस्टच्या ६३ चालकांवर बडतर्फीची, तर ८७६ चालकांवर निलंबनाची कारवाई करण्यात आल्याची माहिती सरकारनं लेखी उत्तरात दिली.

<><><><>

राष्ट्रीय शेअर बाजारात नाशिक महानगरपालिकेच्या ‘ग्रीन बॉण्ड’चं लिस्टिंग आज मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी 'बेल रिंगिंग' नं केलं. कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक महानगरक्षेत्रात सुमारे २५ हजार कोटींची विकास कामं सुरू करण्यात आली आहेत. त्याचा लाभ केवळ कुंभमेळ्यापुरताच नव्हे तर नाशिक शहर विकासाच्या दृष्टीने होणार आहे. असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. मुंबईच्या वांद्रे- कुर्ला संकुलात झालेल्या या कार्यक्रमाला जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, नाशिकच्या महापौर श्रीमती हिमगौरी आहेर, उपमहापौर विलास शिंदे, स्थायी समिती सभापती मच्छिंद्र सानप, नॅशनल स्टॉक एक्सचेंजचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष चौहान यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

<><><><>

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनच्या दुसऱ्या टप्प्याच्या कामकाजाला आजपासून सुरुवात झाली. पश्चिम आशियातल्या भूराजकीय संघर्षाबाबत परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी दोन्ही सभागृहात निवेदन सादर केलं. पश्चिम आशियातल्या परिस्थितीवर सरकारचं लक्ष असून नागरिकांच्या सुरक्षेसाठी दक्ष असल्याचं ते म्हणाले. परिस्थितीचं गांभीर्य लक्षात घेऊनच संबंधित मंत्रालयं समन्वयाने काम करत आहेत. तसंच, पश्चिम आशियातला तणाव कमी करण्यासाठी सरकारकडून राजनैतिक प्रयत्न सुरूच राहतील, असं त्यांनी स्पष्ट केलं. .

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही संयुक्त अरब अमिराती, कतार, सौदी अरेबिया, ओमान, जॉर्डन, इस्त्रायल आणि बहरीनच्या राष्ट्रप्रमुखांशी चर्चा केली आणि त्यांना शांततेचं आवाहन केलं आहे, अशी माहिती त्यांनी दिली. आखाती देशांमध्ये सुमारे १ कोटी भारतीय राहतात. उर्जा सुरक्षा, खनिज तेल आणि वायू पुरवठ्यासाठी हे देश महत्त्वाचे असून ते भारताचे प्रमुख व्यापारी भागीदारही आहेत. त्यामुळे या वाढत्या संघर्षाचा परिणाम जहाज वाहतुकीवर आणि पर्यायाने सामान्य जीवनावर होत असल्याचं जयशंकर यांनी यावेळी नमूद केलं.

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर कच्च्या तेलाच्या दरांमधे वाढ झाली आहे. होर्मुझमार्गे वाहतूक बंद झाल्यानं पुरवठ्यावर परिणाम झाला आहे, तसंच युद्ध स्थितीमुळे कुवैत आणि संयुक्त अरब अमिरातींसारख्या देशांनी खनिज तेल उत्पादन आणि निर्यातीत कपात केली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत सध्या कच्च्या तेलाचं मूल्य प्रतिबॅरल ११० डॉलर्सच्या पुढे गेलं आहे. गेल्या सात दिवसात या दरात ५५ टक्क्यापेक्षा जास्त वाढ झाली आहे.

**<><><><><>**

देशभरात आरोग्य क्षेत्रातल्या पायाभूत सुविधा अधिक मजबूत झाल्या असून जनतेच्या आकांक्षा हा अर्थसंकल्पाचा पाया आणि सरकारची जनतेसाठीची वचनबद्धता असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. ते 'सबका साथ सबका विकास' या धोरणाअंतर्गत अर्थसंकल्पोत्तर वेबिनारला संबोधित करत होते. आयुष्यमान भारत योजनेच्या माध्यमांतून विविध ठिकांणी आरोग्य सेवांचा विस्तार झाला आहे, याचा उल्लेख त्यांनी केला.

….. **होल्ड बाईट- प्रधानमंत्री - - -**

भविष्यात मुलींना तंत्रज्ञानात समान संधी मिळाव्यात आणि तरूण संशोधकांना नवोन्मेष आणि नवनवीन प्रयोग करण्यास प्रोत्साहित करणारी एक मजबूत संशोधन परिसंस्था निर्माण करणार असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

राज्यसभेच्या आगामी द्वैवार्षिक निवडणुकीसाठी भाजपाचे अध्यक्ष नितीन नबीन यांनी आज केंद्रीय निरीक्षकांच्या नियुक्त्या केल्या. बिहारमध्ये छत्तीसगडचे उपमुख्यमंत्री विजय शर्मा आणि केंद्रीय मंत्री हर्ष मल्होत्रा पक्ष निरीक्षक असतील, तर हरियाणामध्ये गुजरातचे उपमुख्यमंत्री हर्ष संघवी, ओदिशामध्ये महाराष्ट्राचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची पक्ष निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचीव एम देवेंदर सिंग आणि संयुक्त संचालक सतीश पडवळ यांचं निलंबन रद्द करण्याचे निर्देश विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आज राज्य सरकारला दिले. पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी बोलावलेल्या बैठकीला

उपस्थित न राहिल्याबद्दल, आणि विचारलेल्या प्रश्नांवर प्रतिसाद न दिल्याबद्दल २७ फेब्रुवारीला या दोन्ही अधिकाऱ्यांना निलंबित केल्याचं पीठासन अधिकाऱ्यांनी जाहीर केलं होतं. मात्र सिंग यांनी दिलगिरी व्यक्त केली असल्याचं सांगत हे निलंबन रद्द करण्याचा प्रस्ताव आज संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांनी मांडला.

**<><><><><>**

टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय संघावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन्, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या विजयासाठी भारतीय संघाचं अभिनंदन केलं आहे. विश्वचषक जिंकल्याबद्दल, आज संसदेच्या आणि राज्य विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातही भारतीय संघाचं अभिनंदन करण्यात आलं. तीन विश्वविक्रम नोंदवत मिळवलेल्या या विजयाबद्दल आनंद व्यक्त करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस म्हणाले...

- **- - होल्ड - बाईट- मुख्यमंत्री - - -**

//<><><><><>//